# जनमत सर्वसामान्यांचे

संपादक : महादेव नरोटे – मो.९४२३३४२९७०

सोलापूर, धाराशिव, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, लातूर

रविवार, दि.२२ जून २०२५


Shankarrao Mohite Mahavidyalaya Library



## शंकरराव मोहिते महाविद्यालयात जागतिक योगा दिवस मोठ्या उत्साहात साजरा

संग्रामनगर दि.२१ (प्रतिनिधी)– अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये 'जागतिक योग दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमला प्रमुख पाहुणे म्हणून योग प्रशिक्षक दत्ता डांगे होते.'मन,मेंदू,मनगट यांचा समन्वय योग्य साधायचा असेल तर योग साधना व दररोज योगासने करून शरीर बळकट करणे आवश्यक आहे' असे मत जागतिक योग दिनानिमित्त योग प्रशिक्षक दत्ता डांगे यांनी व्यक्त केले.दि. २१ जून २०२५ रोजी शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूज येथे जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. योगदिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांनी सर्व उपस्थितांना योगदिनाच्या शुभेच्छा देऊन दररोज शरीर सौष्ठवासाठी योगासने व्यायाम करणे गरजेचे असून 'दिसामासी एक योगासन करावे 'असा संदेश अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना दिला.

योग दिनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.सज्जन पवार,प्रा. दत्तात्रय मगर, डॉ.स्मिता पाटील,जिमखाना प्रमुख प्रा.खंडाप्पा कोरे,एनसीसी प्रमुख प्रा.नंदकुमार गायकवाड,प्रा. अरविंद शेंडगे, कार्यालयीन अधीक्षक राजेंद्र बामणे यांनी प्रयत्न केले.या कार्यक्रमासाठी ज्युनियर विभाग, सीनियर विभागातील प्राध्यापक वृंद, एनएसएस,एनसीसी,जूनियर विभागातील विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj 413101





# शंकरराव मोहिते महाविद्यालयामध्ये ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा

संग्रामनगर दि.१६ (प्रतिनिधी)- 'स्वातंत्र्यासाठी हुतात्मा ठरलेल्या शूर वीरांच्या व समाज सुधारकांच्या कार्याचे ऋण व्यक्त करणे हे आजच्या पीढीचे आद्य कर्तव्य आहे त्यांच्या कार्यामुळेच आपण स्वातंत्र्याचा स्वच्छंदी आनंद घेत आहोत व आजच्या तरूणांनी सामाजिक एकता व अखंडता राखण्यासाठी काम केले पाहिजे' असे मत भारतीय स्वातंत्र्याच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनी प्रमुख पाहुणे म्हणून सयाजीराजे मोहिते पाटील (अध्यक्ष,महाविद्यालय विकास समिती)यांनी व्यक्त केले.या स्वातंत्र्य दिनी तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण त्यांचे शुभ हस्ते करण्यात आले.पुढे त्यांनी उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांनी केले. त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी शुभेच्छा देवून नवीन शैक्षणिक धोरणानुसार आपले व्यक्तीमत्व विकसित करावे असे मत व्यक्त केले. या ७९ व्या भारतीय स्वातंत्र्यदिन ध्वजारोहण समारंभासाठी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य अप्पासाहेब मगर, रणजीत माने देशमुख,शंकरराव मोहिते महाविद्यालय अकलूजचे प्राचार्य,डॉ. एस.के. टिळेकर,बी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य,डॉ.ए.एस. भानवसे,महात्मा फुले शिक्षणशास्त्र महाविद्यालय अकलूजचे प्राचार्या डॉ.जयश्री धुमाळ मॅडम,डी फार्मसी कॉलेज अकलूजचे प्राचार्य प्रा.एन. बी.देवडकर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वृद डॉ.विश्वनाथ आवड,डॉ.बाळासाहेब मुळीक,प्रा.अरविंद शेंडगे,डॉ.सतीश देवकर,डॉ.हनुमंत अवताडे,प्रा. विनायक सूर्यवंशी,राजेंद्र बामणे, अधीक्षक युवराज मालुसरे व महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग,विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जनार्धन परकाळे यांनी केले.

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Library * Akluj 413101



# ती तंत्रज्ञानाच्या युगात हिंदीची व्याप्ती वाढत आहे : डॉ.मालोजी जगताप

(प्रतिनिधी):- येथील डळ,अकलूज संचलित महाविद्यालयात हिंदी हिंदी दिवस समारंभाचे आले. या कार्यक्रमाचे गेला महाविद्यालयातील गी प्राध्यापक डॉ.मालोजी र्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. कर होते. कार्यक्रमाची महर्षी शंकरराव मोहिते ादेवी मोहिते पाटील न करून झाली. प्रमुख जगताप यांनी आपल्या षेचे महत्व, हिंदी बरोबरच ातृभाषेचे महत्व, ख चा म्प्युटर क्षेत्रात वाढता निक युगातील विद्यार्थ्यांचे ययुगीन इतिहासामधील विषयांवर विविध दाखले व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्राचार्य प्रो.डॉ.शिवप्रसाद टिळेकर यांनी हिंदी येणाऱ्या काळात अंतर्राष्ट्रीय भाषा म्हणून ओळखली जाईल असा आशावाद व्यक्त केला. तसेच हिंदी ही जगात तिसऱ्या क्रमांकावर बोलली जाणारी भाषा आहे त्यामुळे हिंदी ही महत्वाची भाषा आहे असा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. हिंदी आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अतिशय महत्वाची भाषा बनत आहे असंही ते म्हणाले.

हिंदी दिवसाचे औचित्य साधून हिंदी विभागाच्या वतीने महाविद्यालयात हिंदी दिवस सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विविध स्पर्धांचे निकाल वाचन करुन बक्षिस वितरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये सामान्य ज्ञान प्रश्न मंजूषा प्रतियोगिता, शेरो- शायरी प्रस्तुतीकरण प्रतियोगिता, हिंदी फिल्मी डायलॉग प्रस्तुतीकरण प्रतियोगिता, जाहिरात प्रस्तुतीकरण प्रतियोगिता व पोष्टर प्रदर्शनी प्रतियोगिता या पाच स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या सर्व स्पर्धांमध्ये एकूण १७० विद्यार्थींनी सहभाग घेतला. सामान्य ज्ञान प्रश्नमंजुषा प्रतयोगिता निकाल प्रथम क्रमांक - सृष्टी पवार, बी.ए.भाग ३ द्वितीय क्रमांक - गौरी गौड, बी.ए.भाग ३ तृतीय क्रमांक - दीक्षा पवार, बी.ए.भाग ३ शेरो-शायरी प्रस्तुतीकरण प्रतियोगिता निकाल प्रथम क्रमांक - गौरी लोंढे, बी.ए.भाग - २ द्वितीय क्रमांक विभागून- राजू देवकर, बी.कॉम.भाग - २, मुस्कान सय्यद, बी.ए.भाग - २ तृतीय क्रमांक विभागून - श्रावणी ढगे, बी.कॉम.भाग - ३, शिवमंगल कश्यप, बी.ए.भाग - १ फिल्मी डायलॉग प्रस्तुतीकरण प्रतियोगिता निकाल प्रथम क्रमांक - श्रावणी ढगे, बी.कॉम.भाग - ३, द्वितीय क्रमांक - मोहिनी तुपे, बी.ए.भाग - ३, तृतीय क्रमांक - निसर्गा मगर, बी.ए.भाग - २ विज्ञापन प्रस्तुतीकरण प्रतियोगिता निकाल प्रथम क्रमांक - दिव्या गिरी बी.ए.भाग - २, द्वितीय क्रमांक विभागून - गौरी लोंढे, बी.ए.भाग - २, फायेजा तांबोळी, बी.ए.भाग - ३, तृतीय क्रमांक विभागून - सुजित चव्हाण, बी.ए.भाग - ३, साहिल भिवरकर, बी.ए.भाग - २ पोस्टर प्रदर्शनी प्रतियोगिता निकाल प्रथम क्रमांक - धनश्री काथवटे, बी.ए.भाग - १, द्वितीय क्रमांक - प्रीती कांबळे, बी.ए.भाग - २, तृतीय क्रमांक - शिवानी वाघ, बी.ए.भाग - १ या सर्व विद्यार्थ्यांनी यश मिळवले. बक्षीस प्राप्त सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, गुलाब पुष्प व प्रथम क्रमांकास गोल्ड, द्वितीय क्रमांकास सिल्वर व तृतीय क्रमांकास ब्रॉंझ मेडल प्रदान करण्यात आले. या स्पर्धांचे परीक्षण प्रा.विनायक सूर्यवंशी, डॉ.रवींद्र माने, डॉ.अण्णासाहेब नलवडे, प्रा.स्मिता पाटील, डॉ.उर्मिला कोडग, डॉ.सविता सातपुते, तसेच सामान्य ज्ञान प्रश्न मंजूषा स्पर्धेचे परीक्षण डॉ. विजयकुमार शिंदे व डॉ.उत्तम वाघमोडे यांनी केले. या कार्यक्रमांचे प्रस्ताविक श्रावणी ढगे, प्रमुख पाहुण्यांचा परिचय सुजित चव्हाण यांनी करुन दिला. तसेच तमन्ना तिकोटे, दिव्या गिरी, संध्या गायकवाड व विशाल खरात या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी लोंढे हिने अत्यंत प्रभावीपणे केले.

शेवटी सर्वांचे आभार फायेजा तांबोळी या विद्यार्थींनीने व्यक्त केले. याप्रसंगी



महाविद्यालयातील डॉ.अण्णासाहेब नलवडे, डॉ.उर्मिला कोडग, डॉ.पल्लवी मिसाळ, प्रा.नयना यादव आदी प्राध्यापिका- प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय मार्गदर्शक संचालक मा.श्री. जयसिंह मोहिते पाटील, सन्माननीय अध्यक्ष मा.संग्रामसिंह मोहिते-पाटील, सन्माननीय संचालिका मा.स्वरुपाराणी मोहिते-पाटील, सन्माननीय सचिव मा.अभिजीत रणवरे साहेब, सन्माननीय सह-सचिव मा.हर्षवर्धन खरा पाटील साहेब व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवप्रसाद टिळेकर यांचे बहुमोल मार्गद लाभले व सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी वि विभागातील सर्व विद्यार्थी, डॉ.विजयकु शिंदे, डॉ.उत्तम वाघमोडे आणि हिंदी वि प्रमुख डॉ.निवृत्ती लोखंडे, रजिस्ट्रार रा बामणे, अधिक्षक युवराज मालुसरे, अ नदाफ यांनी परिश्रम घेतले.

सकाळ TODAY ३
सोलापूर, शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj 413101

# स्वेच्छा निवृत्तीनंतर माघार अमान्य

## नवी मार्गदर्शक तत्त्वे जारी; नोटीस कालावधी कमी

■ सकाळ न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली, ता. ६ : राष्ट्रीय पेन्शन योजनेंतर्गत (एनपीएस) युनिफाईड पेन्शन स्कीम (यूपीएस) निवडलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन आणि पेन्शनधारक कल्याण विभागाने (डीओपीपीडब्ल्यू) स्वेच्छा निवृत्ती आणि संबंधित फायद्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

स्वेच्छा निवृत्तीची मागणी करणाऱ्यांना प्रशासकीय मंजुरीनंतर अर्ज मागे घेता येणार नाही. 'यूपीएस' निवडणाऱ्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्याला स्वेच्छा निवृत्तीचा अधिकार आहे. वीस वर्षे नियमित सेवा पूर्ण केल्यानंतर कर्मचारी आपल्या नियुक्ती प्राधिकरणाला किमान तीन महिन्यांची लेखी सूचना देऊन निवृत्त होऊ शकतो.

नियुक्ती प्राधिकरणाने सूचना कालावधी संपण्यापूर्वी परवानगी स्पष्टपणे नाकारली नाही, तर निवृत्ती त्या कालावधीच्या उल्लेख केलेल्या तारखेपासून आपोआप लागू होईल. त्यापार्श्वभूमीवर विनंती अर्ज आल्यानंतर नियुक्ती प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना गैरसोय होणार नसल्याची खात्री पटल्यानंतर ते तीन महिन्यांचा नोटीस कालावधी कमी करण्याच्या विनंतीवर विचार करू शकतात. नियमानुसार, स्वेच्छानिवृत्तीचा निर्णय घेणाऱ्या कर्मचाऱ्याने प्राधिकरणाला आवश्यक सूचना दिली असल्यास जोपर्यंत ती मंजूर करत नाही तोपर्यंत स्वेच्छा निवृत्तीची विनंती मागे घेण्याची परवानगी नाही. मात्र, अपेक्षित निवृत्तीच्या तारखेच्या किमान पंधरा दिवस आधी विनंती अर्ज करणे आवश्यक आहे, असे 'डीओपीपीडब्ल्यू'ने म्हटले आहे. दरम्यान, कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाच्या विशेष स्वेच्छा निवृत्ती योजनेतील अतिरिक्त कर्मचाऱ्यांना, निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना किंवा स्वायत्त संस्था किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये सामावून घेण्यासाठी निवृत्त होणारे कर्मचारी यांना स्वेच्छा निवृत्तीचे वरील नियम लागू होणार नसल्याचे विभागाने म्हटले आहे.

### खर्च विभागाला निर्णय घ्यावा लागणार

■ एकदा अधिकृत झाल्यानंतर पेन्शन कमी करता येणार नाही, असे केंद्राचे म्हणणे आहे. कारकुनी स्वरूपाची चूक असेल तरच त्यात बदलाची परवानगी असेल. त्यातही दोन वर्षांपेक्षा अधिक काळानंतर चूक आढळल्यास 'डीओपीपीडब्ल्यू'च्या परवानगीनेच अधिकृतपणे बदल केला जाऊ शकेल. अशा कारकुनी चुका आढळल्यास दुरुस्ती आवश्यक आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार संबंधित मंत्रालय किंवा विभागाला आहे.

जनमत सर्वसामान्यांचे

मंगळवार, दि.१६ डिसेंबर २०२५

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413101 * Library

# शंकरराव मोहिते महाविद्यालयात अँटी रॅगिंग मार्गदर्शन विषयक कार्यशाळा संपन्न

संग्रामनगर दि.१३ (प्रतिनिधी)-शंकरराव मोहिते महाविद्यालयात आज अँटी रॅगिंग व अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने अँटी रॅगिंग मार्गदर्शन अधिकार व कायदे या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून अकलूज पोलीस स्टेशनचे निर्भया पथकाचे प्रमुख समाधान देशमुख यांना आमंत्रित करण्यात आले होते.यावेळी व्यासपीठावर हेड पोलीस कॉन्स्टेबल सुहास क्षीरसागर हेही उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातुन रॅगिंगचे होत असलेले प्रकार त्याच्या संदर्भात दिवसेंदिवस वाढत असलेल्या गुन्ह्यांचे प्रमाण व कायद्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.यासाठी महाराष्ट्र सरकारने १९९९ मध्ये केलेल्या कायद्याची माहिती त्याचबरोबर पोलीस स्टेशनमध्ये नोंद होत असणारे गुन्हे यांचे प्रमाण लक्षात घेतले तर यामध्ये तरुण मुलांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.यासाठी तरुण विद्यार्थ्यांनी आपल्या वडिलांचे आणि शिक्षकांचे विचार आत्मसात केले तर त्यांना भविष्यात कोणत्याही प्रकारचे अडचणी येणार नाहीत. त्याचबरोबर त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून निर्माण होणारे धोके याविषयी माहिती देऊन त्यांना आलेले अनुभव विद्यार्थ्यांना कथन केले.त्यासाठी विद्यार्थ्यांनी आभासी जीवनात जगू नये. स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या समाजसुधारकांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवा असेही आवाहन केले. त्याचबरोबर त्यांनी दैनंदिन जीवनात व्यायामाचे महत्त्व देखील सांगितले.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून अँटी रॅगिंग व अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या संदर्भात महाविद्यालयात वेगवेगळ्या घटकांच्या माध्यमातून उपाययोजना करून महाविद्यालय परिसर भयमुक्त आणि सन्मानपूर्वक ठेवण्यासाठी संस्था पातळीवर मोठ्या प्रमाणात प्रयत्न केल्याचे सांगितले.त्यामुळे विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात अध्ययन करावे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या प्रकारची ऊर्जा आहे त्याचा वापर विद्यार्थ्यांनी चांगल्या गोष्टीसाठी



करावा महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे अडचणी सोडवण्यासाठी प्रत्येक वर्गाचे मेंटार मेंटी ग्रुप तयार करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली. त्यामुळे विद्यार्थी संबंधीत शिक्षकांना आपल्या अडचणी सांगून आपल्या समस्या सोडवू शकतात.विद्यार्थ्यांना भविष्यात मोठ्या नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत, परंतु त्यासाठी आपलं चारित्र्य चांगलं असलं पाहिजे यासाठी विद्यार्थ्यांनी चुकीच्या मार्गांचा वापर करू नये असे आवाहन केले.या कार्यक्रमात अभिप्राय देण्यासाठी महाविद्यालयातील वैष्णवी चव्हाण व राजू देवकर यांनी आपली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी अँटी रॅगिंग समिती व अंतर्गत तक्रार निवारण समितीतील सर्व सदस्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सज्जन पवार उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.चंकेश्वर लोंढे यांनी केले तर सूत्रसंचलन डॉ.सविता सातपुते यांनी तर आभार प्रा.स्मिता पाटील यांनी मानले.या कार्यक्रमासाठी ज्युनिअर आणि सिनियर महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित

# ज्ञानाच्या चांगुलपणाची बेरीज व्हावी : डॉ. श्रीपाल सबनीस

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.५ मार्च -**

समाजात केवळ माहितीचा साठा असून चालत नाही, तर त्या ज्ञानाच्या चांगुलपणाची बेरीज होणे काळाची गरज आहे, असे परखड मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज (सोलापूर) आणि शिक्षण प्रसारक मंडळ (अकलूज) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमालेत' ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी सर्वांचे स्वागत करीत या व्याख्यानमालेचा उद्देश सांगताना व्यक्तीपूजेपेक्षा विचारांची पूजा महत्त्वाची हि अत्यंत महत्त्वाची भूमिका मांडली.

डॉ. सबनीस यांनी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. संवादाची संस्कृती जपण्याचे आवाहन डॉ. सबनीस यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महात्मा फुले, महात्मा गांधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांच्या कार्यपद्धतीचा उल्लेख करत त्यांनी महापुरुषांनी नेहमीच जनहिताला प्राधान्य दिल्याचे सांगितले. यावेळी छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाट, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. अतुल लकडे, वासंती सबनीस, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, सिनेट सदस्य महेश माने, प्रा. मोटे, सचिन गायकवाड, बाळकृष्ण लोखंडे, सावंत आदी उपस्थित होते.

संचार सोलापूर
शनिवार, ७ मार्च २०२६
dailysanchar@gmail.com
संस्थापक : अप्पासाहेब काडादी संस्थापक-संपादक : रंगा वैद्य

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj 413101 *

# ज्ञानातून सुसंस्कृत समाजाची निर्मिती

## मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमालेत डॉ. सबनीस यांचे मत

संचार प्रतिनिधी

सोलापूर, दि. ६- समाजात केवळ माहितीचा साठा असून चालत नाही तर त्या ज्ञानाच्या चांगुलपणाची बेरीज होणे ही काळाची गरज आहे, असे परखड मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.



सोलापूर : सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना डॉ. श्रीपाल सबनीस. याप्रसंगी मनोहर सपाटे, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, वासंती सबनीस, डॉ. अतुल लकडे व अन्य.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज आणि शिक्षण प्रसारक मंडळ (अकलूज) यांच्या संयुक्त विद्यमाने येथील श्री छत्रपती शिवाजी प्रशालेत आयोजित सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून डॉ. सबनीस हे बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना या व्याख्यानमालेचा उद्देश स्पष्ट केला. व्यक्तीपूजेपेक्षा विचारांची पूजा अधिक महत्वाची असल्याचे सांगत त्यांनी थोर व्यक्तींचे विचार आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे मत व्यक्त केले.

डॉ. सबनीस यांनी आपल्या खास शैलीत प्रभावी मांडणी करत उपस्थितांची मने जिंकली. सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. संवादाची संस्कृती जपण्याचे आवाहन करत ते म्हणाले, आजच्या डिजिटल युगात आपण माहितीने समृध्द असलो तरी संवाद हरवत चालला आहे. समाजात द्वेषाऐवजी प्रेम आणि ज्ञानाच्या चांगुलपणाची बेरीज झाली, तरच सुसंस्कृत समाज घडू शकतो.

छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महात्मा फुले, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा उल्लेख करत महापुरुषांनी नेहमी जनहिताला प्राधान्य दिले. त्यांचे विचार केवळ पुस्तकांत न ठेवता जीवनात उतरवणे आवश्यक आहे. शिक्षणाचा हेतू केवळ नोकरी मिळवणे नसून चांगला माणूस घडवणे हा असावा, असेही त्यांनी नमूद केले.

ग्रामीण भागात सहकार आणि शिक्षणाची गंगा आणणाऱ्या सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या कार्याचे जतन करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे, सोलापूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अतुल लकडे, वासंती सबनीस, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, महेश माने, प्रा. सचिन गायकवाड यांच्यासह प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ
सोलापूर, रविवार, ८ मार्च २०२६

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library * Akluj 413101 *

# ज्ञानाच्या चांगुलपणाची बेरीज व्हावी

## डॉ. श्रीपाल सबनीस; मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमाला

■ सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. ७ : समाजात केवळ माहितीचा साठा असून चालत नाही, तर त्या ज्ञानाच्या चांगुलपणाची बेरीज होणे काळाची गरज आहे, असे परखड मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज (सोलापूर) आणि शिक्षण प्रसारक मंडळ (अकलूज) यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर येथे आयोजित सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमालेत ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

यावेळी स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी सुरवातीला मनोगत व्यक्त केले. डॉ. सबनीस यांनी आपल्या शैलीत तडफदार आणि प्रभावी मांडणी करत उपस्थितांची मने जिंकली. सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. संवादाची संस्कृती जपण्याचे आवाहन करीत डॉ. सबनीस म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात आपण माहितीने समृद्ध आहोत, पण संवाद हरवत चालला आहे. समाजात द्वेष संपवून प्रेमाच्या आणि ज्ञानाच्या चांगुलपणाची बेरीज झाली, तरच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत समाज घडेल.

यावेळी माजी महापौर मनोहर सपाटे, डॉ. अतुल लकडे, वासंती सबनीस अभिजित रणवरे, हर्षवर्धन खराडे, महेश माने, सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड, प्राचार्य मोटे, प्रा. बाळकृष्ण लोखंडे आदी उपस्थित होते.



**सोलापूर** : श्री शिवाजी नाईट कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात व्यासपीठावर उपस्थित डॉ. श्रीपाल सबनीस, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, वासंती सबनीस, मनोहर सपाटे, डॉ. अतुल लकडे, अभिजित रणवरे, हर्षवर्धन खराडे, महेश माने इतर.

सोलापूर पान १२
संवाद
तरुण भारत
मंगळवार, १० मार्च २०२६

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413101 * Library

# महात्मा बसवेश्वरांचे विचार व कार्य हे मानवतेला उन्नतीकडे नेणारे : कुलगुरू डॉ. महानवर

## शंकरराव मोहिते महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने राष्ट्रीय परिषद आयोजित

**प्रतिनिधी**
अकलूज

महात्मा बसवेश्वरांचे विचार व कार्य हे मानवतेला उन्नतीकडे नेणारे होते, असे मत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी व्यक्त केले.

शंकरराव मोहिते महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते–पाटील अध्यक्षस्थानी होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की सुमारे ९०० वर्षांपूर्वी महात्मा बसवेश्वरांनी पुरोगामी विचार बाळगून समता प्रस्थापित करण्यासाठी क्रांतिकारी अशा स्वरूपाचे कार्य केले. समाजातील स्त्रिया व शूद्र यांना सन्मानाची वागणूक देण्याची आग्रही भूमिका घेतली. सुदृढ समाज निर्माण होण्यासाठी विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून कार्य केले. त्यांचे वास्तव्य आपल्या सोलापूर जिल्ह्यातही दीर्घकाळ होते, ही आपणा सर्वांसाठी अभिमानास्पद बाब आहे. त्यांचे कार्य व्यापक स्वरूपात समाजासमोर यावे, यासाठी विद्यापीठामध्ये महात्मा बसवेश्वर अध्यासन स्थापन केले आहे.



**अकलूज : शंकरराव मोहिते महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय परिषदेत बोलताना कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर.**

### वृक्षारोपणासाठी एक हजार रोपे देणार विद्यापीठाला

कुलगुरूंनी आपल्या भाषणात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परिसरामध्ये वृक्षारोपणासाठी उपस्थितांना रोपे दान करण्याचे आवाहन केले. तो धागा पकडून अध्यक्ष सयाजीराजे मोहिते–पाटील यांनी वृक्षारोपणासाठी एक हजार रोपे विद्यापीठाला देण्याचे जाहीर केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना सयाजीराजे मोहिते–पाटील म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांच्या महान कार्यावर आमच्या महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय इतिहास परिषद होत आहे, ही आम्हा सर्वांसाठी अभिमानास्पद व आनंदाची गोष्ट आहे. महात्मा बसवेश्वरांचे कार्य सर्व समाजासमोर येणे आवश्यक आहे.

यावेळी व्यासपीठावर महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक चंद्रकांत गार्डी, बीजभाषक गजानन धरणे, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक वसंतराव जाधव, रामचंद्र गायकवाड, उत्कर्ष शेटे व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲडव्होकेट रणजितसिंह माने देशमुख, अप्पासो मगर आदी मान्यवर उपस्थित होते.

इतिहास विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय मगर यांनी या राष्ट्रीय परिषदेच्या आयोजनामागची भूमिका विशद करून बीजभाषक प्राचार्य गजानन धरणे यांचा परिचय करून दिला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांनी महाविद्यालयामध्ये होत असलेल्या उपक्रमांचा व उल्लेखनीय बाबींचा आढावा घेऊन या परिषदेसाठी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देणाऱ्या सर्व संशोधक प्राध्यापकांना धन्यवाद दिले.

या परिषदेत ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. चंद्रकांत चव्हाण, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. विष्णू वाघमारे, डॉ. शिवाजीराव वाघमोडे, डॉ. राजेंद्र गायकवाड, आदींनी आपले विचार व्यक्त केले.

ही राष्ट्रीय इतिहास परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. विश्वनाथ आवड ,

डॉ.एच.के.आवताडे, डॉ.बाळासाहेब मुळीक व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रा. विनायक सूर्यवंशी व डॉ. संजय वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. सज्जन पवार यांनी आभार मानले.

सकाळ
TODAY
सोलापूर, मंगळवार, १० मार्च २०२६

Shankarrao Mohite Mahavidyalaya
Library
Akluj 413101

# बसवेश्वरांचे कार्य मानवतेला उन्नतीकडे नेणारे

## कुलगुरू; अकलूजमध्ये बसवेश्वर विचार व कार्य यावर राष्ट्रीय परिषद

**अकलूज, ता. ९ :** महात्मा बसवेश्वरांचे विचार व कार्य मानवतेला उन्नतीकडे नेणारे होते. समाजातील स्त्रिया व शूद्र यांना सन्मानाची वागणूक देण्याची त्यांनी आग्रही भूमिका घेतली. सुदृढ समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून कार्य केले. त्यांचे वास्तव्य सोलापूर जिल्ह्यातही दीर्घकाळ होते, ही एक अभिमानास्पद बाब असल्याचे मत कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी व्यक्त केले.

शंकरराव मोहिते महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, महात्मा बसवेश्वर अध्यासन व शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महात्मा बसवेश्वर विचार व कार्य' या विषयावर राष्ट्रीय परिषदेच्या शुभारंभ प्रसंगी डॉ. प्रकाश महानवर बोलत होते.

यावेळी सभापती सयाजीराजे मोहिते-पाटील, महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक चंद्रकांत गार्डी,



**अकलूज :** राष्ट्रीय परिषदेच्या शुभारंभप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर.

बीजभाषक गजानन धरणे, संचालक वसंत जाधव, रामचंद्र गायकवाड, उत्कर्ष शेटे, अॅड. रणजितसिंह माने देशमुख, अप्पासो मगर, डॉ. शिवप्रसाद टिळेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले की, सुमारे ९०० वर्षांपूर्वी महात्मा बसवेश्वरांनी पुरोगामी विचार बाळगून समता प्रस्थापित करण्यासाठी क्रांतिकारी स्वरूपाचे कार्य केले. त्यांच्या कार्याचा प्रभाव व्यापक स्वरूपात समाजासमोर यावा, यासाठी विद्यापीठामध्ये महात्मा बसवेश्वर अध्यासन स्थापन केले आहे. परिषदेच्या द्वितीय सत्रात, सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ कर्नाटक (कलबुर्गी) येथील डॉ. बी. बी. पुजारी यांनी महात्मा बसवेश्वरांच्या कानडी भाषेत असलेल्या विविध वचनांवर व साहित्यावर विस्तृत विवेचन केले. या सत्राचे अध्यक्ष होते डॉ. प्रभाकर कोळेकर. तिसऱ्या सत्रात दोन टप्प्यात विविध भागातून आलेल्या संशोधक प्राध्यापकांनी शोधनिबंध सादर केले. समारोप सत्रात ज्येष्ठ अभ्यासक बी. एम. पाटील यांनी बसवेश्वरांच्या कार्यावर परिषदेचा आढावा घेतला. परिषदेतील ज्येष्ठ इतिहास अभ्यासकांमध्ये डॉ. चंद्रकांत चव्हाण, डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. विष्णू वाघमारे, डॉ. शिवाजीराव वाघमोडे, डॉ. राजेंद्र गायकवाड यांचा समावेश होता, ज्यांनी महात्मा बसवेश्वरांच्या कार्यावर विचार व्यक्त केले.

जनसत्य

सोमवार, दि. १६ मार्च २०२६

Shankarrao Mohite Mahavidyalaya * Akluj 413101 * Library

# बसवेश्वरांचे विचार व कार्य हे मानवतेला उन्नतीकडे नेणारे ; कुलगुरु डॉ.महानवर

**जनसत्य, प्रतिनिधी**

**अकलूज :** महात्मा बसवेश्वरांचे विचार व कार्य हे मानवतेला उन्नतीकडे नेणारे होते ,असे मत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी शंकरराव मोहिते महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदेत उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष सयाजीराजे मोहिते पाटील हे होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, सुमारे ९०० वर्षांपूर्वी महात्मा बसवेश्वरांनी पुरोगामी विचार बाळगून समता प्रस्थापित करण्यासाठी क्रांतिकारी अशा स्वरूपाचे कार्य केले. सुदृढ समाज निर्माण होण्यासाठी विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून कार्य केले. त्यांचे वास्तव्य आपल्या सोलापूर जिल्ह्यातही दीर्घकाळ होते, ही आपणा सर्वांसाठी अभिमानास्पद बाब आहे.त्यांचे कार्य व्यापक स्वरूपात समाजासमोर यावे, यासाठी विद्यापीठामध्ये महात्मा बसवेश्वर अध्यासन स्थापन केले आहे.

अध्यक्ष स्थानावरून बोलताना ,सयाजीराजे मोहिते पाटील म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांच्या महान कार्यावर आमच्या महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय इतिहास परिषद होत आहे, ही आम्हा सर्वांसाठी अभिमानास्पद व आनंदाची गोष्ट आहे. महात्मा बसवेश्वरांचे कार्य सर्व समाजासमोर येणे आवश्यक आहे.

यावेळी व्यासपीठावर महात्मा बसवेश्वर अध्यासनाचे संचालक चंद्रकांत गार्डी, बीजभाषक गजानन धरणे, शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक वसंतराव जाधव ,रामचंद्र गायकवाड, उत्कर्ष शेटे व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य एडव्होकेट रणजीतसिंह माने देशमुख,अप्पासो मगर आदी मान्यवर उपस्थित होते.

जनमत सर्वसामान्यांचे

गुरूवार, दि.१९ मार्च २०२६

Shankarrao Mohite Mahavidyalaya Library Akluj 413101

# शाळा-महाविद्यालयांत 'शाळा, कॉलेज तिथे नाटक' उपक्रम राबविणार

## अकलूज नाट्य परिषदेचा अनोखा उपक्रम




अकलूज, दि.१८ (प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांमध्ये नाट्यकलेबद्दल आवड निर्माण व्हावी, त्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा तसेच त्यांच्यात दडलेले अभिनय गुण विकसित व्हावेत या उद्देशाने अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई शाखा अकलूज यांच्या वतीने 'शाळा-कॉलेज तिथे नाटक' हा विशेष सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून शाळा व महाविद्यालयांच्या प्रांगणात जाऊन विद्यार्थ्यांसाठी थेट नाट्य सादरीकरण करण्यात येणार असल्याची माहिती अकलूज शाखेचे प्रमुख कार्यवाह डॉ.विश्वनाथ आवड यांनी दिली. डॉ.आवड म्हणाले, नाट्य परिषदेचे अध्यक्ष खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. नाटक ही केवळ मनोरंजनाची कला नसून ती समाजाचे प्रतिबिंब दाखवणारी आणि जीवनातील विविध पैलूंना स्पर्श करणारी प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात नाट्यकलेचे महत्त्वपूर्ण योगदान असते. अभिनय, संवादकौशल्य, आत्मविश्वास, टीमवर्क आणि सर्जनशीलता वाढविण्यासाठी नाटक हा अत्यंत प्रभावी मार्ग मानला जातो. याच उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शाळा किंवा महाविद्यालयाच्या प्रांगणात सुमारे एक तासाचे नाट्य सादरीकरण केले जाणार असून यामध्ये सामाजिक आशय असलेली तसेच विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारी नाट्यकृती सादर करण्यात येईल. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी संबंधित शैक्षणिक संस्थांकडून कोणतेही मानधन घेतले जाणार नाही. सादरीकरणासाठी येणारे कलाकार हे नाट्य परिषदेचे अनुभवी कलाकार असतील. शाळा व महाविद्यालयांनी आपल्या सोयीप्रमाणे कार्यक्रमाची वेळ व दिनांक निश्चित करून कळवावा. हा उपक्रम २० मार्च ते ३० मार्च या कालावधीत आयोजित करण्यात येणार असून कार्यक्रम आयोजित करण्यासाठी इच्छुक संस्थांनी १९ मार्चपर्यंत संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

सदर कार्यक्रम स्टेज, सभागृह, हॉल किंवा वर्गखोलीत देखील सहज आयोजित करता येईल. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नाट्यप्रयोग पाहण्याची संधी मिळणार असून त्यांच्या कलागुणांना प्रेरणा मिळेल. या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शाळा व महाविद्यालयांनी अधिक माहितीसाठी ९४२२०२८८३८, ७७७६० ६२४०२, ८४८३८ १५३९४, ८०५५० ४१२६०, ९५०३७७३०७३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही नाट्य परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.